महाराष्ट्र शासन
# शासकीय विधी महाविद्यालय
"ए" रोड, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०.

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४१७०७
Website- www.glcmumbai.com

फॅक्स ०२२-२२०४१७०८
Email id- principal@glcmumbai.com

क्रमांक -शाविम/निर्लेखन/२०१७-२०१८/ 152

दिनांक- १५/०१/२०१८

## निर्लेखन सूचना क्र. ०२

### शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथील जुने व नादुरुस्त साहित्य निर्लेखित करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत..

मा. प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांच्या वतीने दि. ०२/११/२०१७ रोजी महाविद्यालयातील जुन्या साहित्यांचे ( लाकडी टेबल, खुर्च्या व इतर लाकडी साहित्य, लोखंडी कपाट व इतर तत्सम साहित्य) निर्लेखन करण्यासाठी पात्र व अनुभवी पुरवठादारांकडून मोहोरबंद लिफाप्यामध्ये दरपत्रक मागविण्यात आले होते. परंतु प्राप्त दरपत्रकधारांमधून पात्र व क्र. ०१ च्या दरपत्रकधारकाने सदर साहित्याचे स्विकृती आदेश व साहित्याचा ताबा घेण्यास नकार दिला. त्यामुळे निर्लेखन सूचना क्र. ०२ प्रसिध्द करण्यात येत आहे. यानुसार दरपत्रकधारकांनी दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक २२/०१/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे. तरी इच्छुक व पात्र पुरवठादारांनी नमूद अंतिम दिनांकापर्यंत दरपत्रक महाविद्यालयामध्ये सादर करावेत. दरपत्रकधारकांनी Principal Government Law College Mumbai यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेचा रु. १०,०००/- इतका डी.डी. अनामात रक्कम म्हणून दरपत्रकासोबत सादर करावा. दरपत्रके स्विकारण्याचा (विहित मुदतीमध्ये किंवा त्यानंतर) किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत. त्याचप्रमाणे प्राप्त दरपत्रकधारांमधून पात्र क्र. ०१ च्या दरपत्रकधारकाची निवड सबंधित कामासाठी झाली व त्याने काही कारणास्तव कामाचे स्विकृती आदेश घेण्यास नकार दिल्यास त्यापुढील कार्यवाही करण्याचा अधिकार प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत.

दरपत्रकधारकांना सदर साहित्याची पाहणी दि. २१/०१/२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये महाविद्यालयामध्ये करता येईल.

15/1/18

श्रीमती सुवर्णा केवले,
प्राचार्य,
शासकीय विधी महाविद्यालय,मुंबई.

प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'ओ' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०

दिनांक-१५/०१/२०१८

GOVERNMENT LAW COLLEGE MUMBAI

: Desktop/Sajan//SJN2